# महाराष्ट्र शासन
# श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैदयकीय महाविदयालय,धुळे
## SHRI BHAUSAHEB HIRE GOVERNMENT MEDICAL COLLEGE, DHULE

जा.क्र.शावैमधु/व्ही.आर.डी.एल./कंत्राटीपदे/जाहिरात/10115 /2021दि. 06/08/2021

## जाहिरात

विषय-: व्ही.आर.डी.एल.(VRDL) लॅबसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर (364 दिवसांकरीता) पदे भरणेबाबत..

शासकीय वैदयकीय महाविदयालय,धुळे अंतर्गत व्ही.आर.डी.एल.(Virus Research & Diagnostic Laboratory) या प्रयोगशाळेकरिता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर (364 दिवसांकरिता) पदे नेमणुक करावयाची असून यासाठी इच्छुक उमेदवारांनी अर्ज करावेत. अर्ज स्वहस्ते खाली नमुद केलेल्या ठिकाणी विहित कालावधीत सादर करावा. ई-मेल, पोस्ट, कुरियरने पाठलिले व अपुर्ण अर्ज स्विकारले जाणार नाहीत. अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्रे दोन(2) छायांकित प्रतींमध्ये जोडावीत, तसेच मुलाखतीच्यावेळी मुळ कागदपत्रे सादर करावीत. अधिष्ठता कार्यालय, शासकीय वैदयकीय महाविदयालय, धुळे येथे मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे. भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | वयं |
|---|---|---|---|---|---|
| 1 | रिसर्च सांयटिस्ट-1 (मेडिकल) | 01 | मान्यताप्राप्त विदयापीठातून एम.डी. मायक्रोबायॉलॉजी अथवा मान्यताप्राप्त विदयापीठातुन एम.बी.बी.एस. आणि तीन वर्ष मायाक्रोबायॉलॉजी/पॅथोलॉजी/ व्हायरॉलॉजी | रु. 56,000 + HRA | लागू नाही |
| 2 | रिसर्च सांयटिस्ट-1 (नॉन-मेडिकल) | 01 | मान्यताप्राप्त विदयापीठातून पी.एच.डी. मेडिकल मायक्रोबायॉलॉजी अथवा मान्यताप्राप्त विदयापीठातुन एम.एस.सी. मेडिकल मायक्रोबायॉलॉजी तीन वर्ष मायाक्रोबायॉलॉजी/व्हायरॉलॉजी अनुभवासह | रु.56,000 + HRA | 35 वर्षे |
| 3 | रिसर्च असिस्टंट-1 | 01 | मान्यताप्राप्त विदयापीठातुन एम.एस.सी. (मेडिकल मायक्रोबायॉलॉजी/बायोटेक्नॉलॉजी) प्रमाणपत्र | रु. 35,000/- प्रतिमहिना | 30 वर्षे |
| 4 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 02 | मानयताप्राप्त विदयापीठातून बी.एस.सी.डी.एम.एल.टी शासकीय वैदयकीय महाविदयालय | रु. 20,000/- + HRA | 30 वर्षे |
| 5 | डाटा एन्ट्री ऑपरेटर | 01 | पदवीधर, MS-CIT, टंकलेखन प्रशिक्षण मराठी-इंग्रजी किमान 40 WPM,मान्यताप्राप्त संस्थेचा 2 वर्षाचा अनुभव | 20,000/- प्रतिमहिना | कमाल 30 वर्षे |
| 6 | मल्टी टास्किंग स्टाफ | 01 | पदवीधर, MS-CIT, कार्यालयीन अनुभव 2 वर्ष व बॅंकेच्या व्यवहाराचे ज्ञान | 18,000/- प्रतिमहिना | कमाल 30 वर्षे |

अर्ज स्विकारण्याचा कालावधी : दिनांक 17/08/2021 ते 25/08/2021.
अर्ज स्विकारण्याचे ठिकाण : सुक्ष्मजीवशास्त्र विभाग, शासकीय वैदयकीय महाविदयालय, धुळे (कार्यालयीन वेळेत)
मुलाखतीचे ठिकाण : अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैदयकीय महाविदयालय,धुळे
पात्र उमेदवारांची यादी : दिनांक01/09/2021 कार्यालयीन सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल
(मुलाखतीस पात्र उमेदवारांचा मुलाखतीचा दिनांक सदर यादीत नमुद करण्यात येईल)

## अटी व शर्ती:

1. सदरची नियुक्ती ही पूर्णपणे कंत्राटी तत्वावर असल्याने नियुक्त होणा-या उमेदवारांना शासकीय कर्मचारी यांच्या मिळणा-या सोई सुविधांचा लाभ मिळणार नाही.

2. नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरतील.

3. करार पदधतीवरील नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

4. करार पदधतीवर नियुक्त केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभागप्रमुख व अधिष्ठाता हे नियमितपणे घेतील. प्रथम तीन महिन्याचा आढावा असमाधानकारक असल्यास संबंधीत उमेदवाराची नियुक्ती कोणतीही पूर्व सुचना न देतासमाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता विभागप्रमुख यांच्याकडे राहतील.

5. करार पदधतीच्या उमेदवारास विभागाचे प्रमुख व अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली आपले कर्तव्य व जबाबदा-यापार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित पूर्ण वेळ काम करणे बंधनकारक राहील. सदर पदे ही साथरोग नियंत्रणप्रकल्पांतर्गत असल्याने परिसरात उदभवणा-या साथरोगांच्या उद्रेकांच्या वेळी प्रसंगानुरुप उद्रेकाच्या ठिकाणी जाऊन कामकाज करावे लागेल.

6. सदरील नियुक्तीसाठी ICMR, VRD Lab, NIV, Pune किंवा MSACS अंतर्गत काम केलेल्या कर्मचा-यांना प्राधान्य देण्यात येईल.

7. करार पदधतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही.

8. करार पदधतीवरील नियुक्त उमेदवारांनी कामावर रुजु होण्यापूर्वी वरील अटी व शर्ती मान्य असल्याची लेखी हमीरु. 100 चा स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र/ करारपत्र नोटरी करुन कामावर रुजु होताना सादर करणे आवश्यक आहे. तसेच पदाच्या नियुक्ती आदेशाचा संदर्भ घेऊन मा. न्यायालयात कायमस्वरुपी कामावर सामावून घेणे बाबत याचिका दाखल करणार नसल्याबाबत निवड झालेल्या उमेदवाराकडून प्रतिज्ञापत्र (100 रु. बॉन्ड पेपरवर) लिहूनघेण्यात येईल.

9. नियम व अटीच्या अधीन राहून नियुक्ती आदेश देण्यात येतील. उच्च शैक्षणिक धारकास व अनुभव असलेल्याउमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

10. उमेदवारास संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. एम.एस.सी.आय.टी. किंवा तत्स्म संगणक परिक्षा उर्तीर्ण प्रमाणपत्र अपेक्षीत आहे.

11. उपरोक्त दिलेल्या दिनांकास व वेळेत सर्व पात्र अर्जधारकांची मुलाखत घेण्यात येईल.

12. निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील यासाठी कोणतेही निवेदन / तक्रार विचारात घेतले जाणार नाही.

13. कोणतीही पुर्वसुचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलण्याचे किंवा रदद करण्याचे अधिकार निवड समितीनेराखुन ठेवले आहेत.

अधिष्ठाता,
श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय,धुळे

अधिष्ठाता
शासकीय वैदयकीय महाविदयालय,धुळे

# अर्जाचा नमुना

पासपोर्ट आकाराचा एक फोटो चिकटवून त्यावर उमेदवाराने स्वाक्षरी करावी व एक फोटो सोबत आणावा.

प्रति,
मा. अधिष्ठाता,
शासकीय वैदयकीय माहविदयालय,धुळे

पदाचे नाव: ..........................................................................................

1. अर्जदाराचे नाव : ..........................................................................................

2. अर्जदाराचे नावात बदल असल्यास : ..........................................................................................

3. जन्मिदनांक : ..........................................................................................

4. पत्रव्यवहाराचा पत्ता : ..........................................................................................

5. कायमस्वरुपी पत्ता : ..........................................................................................

6. ई-मेल आयडी : ..........................................................................................

7. दुरध्वनी /भ्रमणध्वनी नं. : ..........................................................................................

8. संगणकाचे ज्ञान(एम.एस.सी.आय.टी. किंवा तत्स्म संगणक परिक्षा उर्तीर्ण प्रमाणपत्र)

आहे नाही

9. शैक्षणिक अर्हता:

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | संस्था/विदयापीठाचे नाव | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

10. अनुभवाचा तपशील:

| अ.क्र. | कामकाजाच्या ठिकाणाचे नाव | पदनाम | कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

11. अतिरिक्त शैक्षणिक अर्हता:

ठिकाण:

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी

दिनांक:

सहपत्रे :

1) शैक्षणिक अर्हताचे प्रमाणपत्रे (गुणपत्रिका, पदवी व पदव्युत्तर प्रमाणपत्रे, एमएमसी रजिस्ट्रेशन)
2) जन्मतारखेचा दाखला अथवा एस.एस.सी. उत्तीर्ण प्रमाणपत्र
3) एम.एस.सी.आय.टी. किंवा तत्स्म संगणक परिक्षा उर्तीर्ण प्रमाणपत्र
4) नावात बदल असल्यास गॅझेट प्रमाणपत्र
5) अनुभवाचे प्रमाणपत्र
6) ओळखपत्रे (आधार कार्ड किंवा पॅनकार्ड इ.)